# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## जाहीर प्रकटन

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील विविध शैक्षणिक विभागांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाकरिता **सहायक प्राध्यापक (करारपध्दतीने)** पदे भरण्यासाठी दिनांक १८ जून, २०२५ रोजी परिपत्रक क्र.एटी/एनएफ/६९५ प्रसिध्द करण्यात आले होते. सदर परिपत्रकास अनुसरुन ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांच्या मुलाखती दिनांक १७ जुलै, २०२५ ते दिनांक २१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये संबंधित विभागांमध्ये आयोजित करण्यात आल्या होत्या.

उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापन या बाबींना मिळालेले ८०% इतके गुण (वेटेज) आणि मुलाखती अंतर्गत निवड समितीने दिलेले २०% इतके गुण (वेटेज) या दोन्ही बाबी एकत्रित करुन १०० गुणांपैकी प्राप्त गुणांनुसार उमेदवारांची गुणवत्ता व निवड यादी तयार करण्यात आली आहे. (सोबत यादी) सदरील गुणवत्ता व निवड यादी उमेदवाराने ऑनलाईन अर्ज करतेवेळी अर्जासोबत दिलेली माहिती आणि कागदपत्रांच्या सत्यता पडताळणीच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे. निवड झालेल्या उमेदवारांना त्यांची नियुक्ती पत्रे संबंधित विभागांमार्फत दिनांक ०२ ऑगस्ट, २०२५ ते दिनांक ०५ ऑगस्ट, २०२५ या कालावधीत देण्यात येतील. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
जावक क्र. :- एटी/ ९००
दिनांक :- 01/08/2025

(प्रा.(डॉ.)ज्योती भाकरे)
**प्रभारी कुलसचिव**